PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chikat Navara
Year: 1994

Song: Thamb Thamb Pori
Lyricist: Pravin Davane

थांब थांब थांब पोरी
राग तुझ्या नाकावरी
थांब थांब थांब पोरी
राग तुझ्या नाकावरी
बंद नको करू तूगं
उघड उघड उघड तू गं
हा दरवाजा
घरात मला येऊ दे गं
ए उघड उघड उघड तू गं
हा दरवाजा
घरात मला येऊ दे गं
ना ना ना ना
थांब थांब तिथं पोरा
घडयाळात बघ जरा
थांब थांब तिथं पोरा
घडयाळात बघ जरा
उशीर तुला झालाय रं
उघणार नाही आता मी
हा दरवाजा
घरात तुला घेणार नाही रं
अगं अगं उघड उघड उघड तू गं
हा दरवाजा
घरात मला येऊ दे गं

घडयाळाचा काटा तुझा
टोचे मला गं
घरात माझ्या रहायचं तर
वेळ पाळ रं
नियम तुझा यम होऊन
घेतोय जीव गं
येणार नाही तुझी मला
कधी कीव रं
थांबू किती मी येऊ दे दया
थांबू किती मी येऊ दे दया
तुझं नाटक सारं ओळखून
आहे मी जारं पोरा जा

थांब थांब थांब पोरी
राग तुझ्या नाकावरी
थांब थांब थांब पोरी
राग तुझ्या नाकावरी
बंद नको करू तूगं
उघड उघड उघड तूगं
हा दरवाजा
घरात मला येऊ दे गं
ना ना ना ना
उघडणार नाही आता मी
हा दरवाजा
घरात तुला घेणार नाही रं

भाडं देतो महिन्याला
तरी जाच हा
हां स्वस्तामध्ये पडे तुला
फुटपाथ हा
थंडीमध्ये कुडकुडतो
त्यात डास हे
हां उशीराने येणाऱ्याला शिक्षा पाहिजे
थांबू किती मी येऊ दे दया

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

थांबू किती मी येऊ दे दया
पुन्हा नाही येणार उशीरा
आज माफ कर गं तू मला
हं... येरे येरे येरे पोरा
घेते मी तुला घरा
येरे येरे येरे पोरा
घेते मी तुला घरा
उशीर तुला जरी झाला यंरं

उघडते रे तुमच्यासाठी मी
हा दरवाजा
घरात तुला घेते मी रं
ये ये
उघडते रे तुमच्यासाठी मी
हा दरवाजा
घराततुला घेते मी रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*